राष्ट्रीय
डेरी
विकास
बोर्ड

# दुधाळ जनावरांच्या विविध रोगांवरील पारंपारिक उपचार पद्धती














TDU
INSTITUTE OF TRANSDISCIPLINARY
HEALTH SCIENCES & TECHNOLOGY

# स्तनदाह (सर्व प्रकारचा)




कोरफड





हळद



लिंबू



चुना

## जल मिश्रीत उपचार

**सामग्री :** (एक दिवसा साठी)

**(क) कोरफड - 250 ग्रॅम, (ख) हळद - 50 ग्रॅम, (ग) चुना - 15 ग्रॅम, (घ) लिंबू - 2 नग**

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. कोरफडीच्या पानाचे लहान तुकडे करून घ्या (काटे काढून)
2. कोरफडीच्या पानाचे तुकडे, हळद आणि चुना यांचे लालसर मिश्रण मिक्सरच्या सहाय्याने तयार करा

## वापर करण्याची पद्धत :

1. मुठभर पेस्ट मध्ये 150-200 मिली पाणी घालून पातळ मिश्रण तयार करा
2. कासेला धुवून व स्वच्छ करून मिश्रण पूर्ण सडावर लावा
3. वरील मिश्रण दिवसाला 10 वेळां असे सलग 5 दिवस लावा
4. 2 लिंबूचे काप दिवसातून दोन वेळा सलग तीन दिवस चारणे
5. दिवसातील शेवटचा उपचार तेल आधारीत असावा

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# स्तनदाह (सर्व प्रकारचा)


कोरफड




तीळ किंवा मोहरीचे तेल


लिंबू


चुना


हळद

## तेल मिश्रीत उपचार

**सामग्री :** (एक दिवसा साठी)
कोरफड - 250 ग्रॅम, हळद - 50 ग्रॅम, चुना - 15 ग्रॅम,
लिंबू - 6 नग, तीळ किंवा मोहरीचे तेल - 600ml

### मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. कोरफडीच्या पानाचे लहान तुकडे करून घ्या (काटे काढून)
2. कोरफडीच्या पानाचे तुकडे, हळद आणि चुना यांचे लालसर मिश्रण मिक्सरच्या सहाय्याने तयार करा

### वापर करण्याची पद्धत :

1. कास व्यवस्थित साफ करून कोरडे करा 2. मूठभर मिश्रण घेऊन 200 मिलि तीळ किंवा मोहरीचे तेल त्यात मिक्स करा 3. वरील तरल मिश्रण दिवसातून तीन वेळेस कासेवर लावत रहा प्रत्येक वेळेस नवीन मिश्रण तयार करा 4. एका वेळेस दोन लिंबूचे काप करून घ्या असे तीन वेळेस चारत रहा. असा प्रयोग 3 दिवस करत रहा.

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# स्तन मार्गामध्ये अडथळा



कडू लिंबाच्या पानाची काडी





हळद

लोणी



किंवा



तूप

## सामग्री :

ताजी तोडलेली कडू लिंबाच्या पानाची काडी - 1, हळद, लोणी किंवा तूप

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. सडाच्या लांबी एवढी कडू लिंबाच्या पानाची काडी वरच्या भागाकडून तोडावे
2. हळद आणि लोणी किंवा तूप यांची पेस्ट लिंबाच्या पानाच्या काडीवर सर्व बाजूंनी लावून घ्या
3. स्तनाग्राला व्यवस्थीत साफ करा

## वापर करण्याची पद्धत :

1. हळद आणि लोणी किंवा तूप यांची पेस्ट लिंबाच्या पानाच्या काडीवर सर्व बाजूंनी लावून घ्या
2. पेस्ट लावलेली काडी मोठ्या भागाला पकडून ती घड्याळाच्या काट्याच्या विरुद्ध दिशेने (anti-clockwise) फिरवत स्तन मार्गामध्ये घाला
3. दूध काढल्यानंतर प्रत्येक वेळी नवीन कडूलिंबाच्या पानाची काडी वापरा

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# कासेवर/ सडावर सूज येणे



गोडे तेल





हळद



लसूण

## सामग्री :

तीळ किंवा मोहरीचे तेल - 200 मिलि, हळद पाऊडर - 1 मूठ, लसूण - दोन पाकळ्या

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. तेल गरम करण्यास ठेवा, त्याच्यामध्ये हळद आणि लसूण कापुन टाका
2. व्यवस्थित एकजीव करा आणि सुगंधित वास येण्यास सुरुवात झाल्यास मिश्रण तापवणे बंद करा (उकळविण्याची गरज नाही)
3. थंड करून घ्या

## वापर करण्याची पद्धत :

1. हे मिश्रण हाताने वर्तुळाकार (दबाव देत) फिरवत पूर्ण सूज असलेला भाग व कासेवर लावा
2. दिवसातून चार वेळा असे सलग तीन दिवस वापर करा

## नोट:

हे मिश्रण लावण्या अगोदर पशुला स्तनदाह/दगडी नाही याची खात्री करावी

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# झार/वार न पडणे



मुळा





भेंडी



गुळ



मीठ

## सामग्री :

मुळा - 1 नग, भेंडी - 1.5 किलो, गुळ - आवश्यकते नुसार, मीठ - आवश्यकते नुसार

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. प्रत्येक भेंडीला दोन भागामध्ये उभे चिरून घ्या

## वापर करण्याची पद्धत :

1. व्यायल्यानंतर दोन तासाच्या आत एक मुळा पूर्ण खाऊ घाला

2.आठ तासा नंतरही झार पडला नसेल तर 1.5 किलो भेंडी गुळ आणि मीठा सोबत पशुला खाऊ घाला

3. 12 तासा नंतरही झार पडला नसेल तर झाराच्या मुळाशी गाठ बांधून घ्या आणि गाठीपासून तीन इंच खालून झार कापून घ्या. गाठ योनिमार्गात परत जाईल.

4. हाताने झार काढण्याचा प्रयत्न करू नका

5. चार आठवड्या पर्यन्त एक एक मुळा प्रत्येक आठवड्याला खाऊ घालत रहा.

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# उलटणे/गाभण न राहणे



मुळा



कोरपड






हाडजोड




शेवगा



गुळ



कडीपत्ता



मीठ



हळद

## वापर करण्याची पद्धत :

1. माजाच्या पहिल्या किंवा दूसऱ्या दिवसापासून उपचार सुरू करावा
2. खाली दिल्याप्रमाणे क्रमवार ताजी सामग्री दिवसातून एकदा गुळ आणि मिठासोबत खाऊ घालावी

- 1 मुळा दर रोज असे पाच दिवस
- कोरफडीचे एक पान दर रोज असे चार दिवस
- चार मूठी शेवग्याची पाने चार दिवस
- चार मूठी हडजोड चार दिवस
- चार मूठी कडी पत्ता व हळद चार दिवस
- जर पशु गाभण राहिला नाही तर परत एकदा हा उपचार करा

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# अंग/भांड बाहेर येणे






कोरफड



हळद



लाजाळूचे पान

## सामग्री :

कोरफड - 1 पूर्ण पान, हळद - 1 चिमुट, लाजाळूचे पान-2 मूठी

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. कोरफडीचे पान चिरून त्याचे जेल काढून घ्या
2. कोरफडीच्या जेलचा चिकटपणा कमी होईपर्यंत वारंवार जेलला पाण्यात धुवत रहा
3. जेल मध्ये 1 चिमुट हळद टाकून जेल निम्मे होई पर्यन्त उकळत रहा आणि नंतर थंड होऊ द्या
4. लाजाळूच्या पानाची पेस्ट तयार करा

## वापर करण्याची पद्धत :

1. बाहेर आलेले अंग व्यवस्थिपणे स्वच्छ करा
2. बाहेर आलेल्या अंगावर जेल शिंपडावे
3.बाहेर पडलेल्या अंगावरील जेल वाळल्यानंतर त्यावर लाजाळूची पेस्ट लावा
4. अंगपूर्णपणे आत जाई पर्यंत ही प्रक्रिया वारंवार करत रहा

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# लाळ्या खरकुत- तोंडामधील जखम



जिरे





काळे मिरे



लसूण



गुळ



हळद



मेथीदाने



नारळ/ श्रीफळ

## सामग्री :

जिरे - 10 ग्राम, मेथीदाने - 10 ग्राम, काळे मिरे - 10 ग्राम, हळद - 10 ग्राम, लसूण - 4 कळ्या, श्रीफळ - 1 नग, गुळ - 120 ग्राम

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. जिरे, मेथी आणि मिरे 20 ते 30 मिनिटे पाण्यात भिजत ठेवा
2. त्यानंतर वरील सर्व सामग्री एकत्र करून त्याची पेस्ट बनवा.
3. एक पूर्ण किसलेले नारळ पेस्ट मध्ये टाका आणि हाताने एकजीव करा
4. प्रत्येक वेळेस ताजे मिश्रण वापरा

## वापर करण्याची पद्धत :

1. पेस्ट, नारळ आणि गूळ याच्या मिश्रणाचे छोटे लाडू बनवून ते पशूच्या तोंडामध्ये, जिभेवर, टाळू या भागावर हळुवार हाताने लावा.
2. दिवसातून तीनदा असे सलग 3-5 दिवस लावावे

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# खरकुत: खुरामधील जखम



कुप्पी / पान





कडूलिंब



लसूण



हळद



खोबरे तेल

किंवा




तीळ तेल



मेंदी



तुळस



सीताफळाचे पान

## सामग्री :

कुप्पी / पान- 1 मूठ, लसूण - 10 पाकळ्या, कडूलिंब पान - 1 मूठ, खोबरे तेल - 500 मिलि, हळद-20 ग्राम, मेंदीचे पान- 1 मूठ, तुळशीचे पान - 1 मूठ

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. वरील सामग्रीची पेस्ट बनवून घ्या
2. वरील पेस्ट मधे 500 मिलि खोबऱ्याचे किंवा तिळाचे तेल मिसळून ते उकळून थंड करा

## वापर करण्याची पद्धत :

1. जखम साफ करून जखमेवर वरील पेस्ट लावा आणि गरज असेल तर बँडेज ने बांधून ठेवा
2. जर जखमे मधे अळ्या झाल्या असतील तर पहिल्या दिवशी खोबरे तेलामध्ये कापूर टाकून ते तेल किंवा सीताफळाच्या पानाची पेस्ट जखमे वर लावा.

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# ताप




**सामग्री :** (एक दिवसासाठी)

लसूण - 2 पाकळ्या, धने- 10 ग्राम, जिरे- 10 ग्राम, तुळस पान- 1 मूठ, दालचिनीचे वाळलेले पान - 10 ग्राम, काळे मिरे- 10 ग्राम, विड्याचे पान- 5 पान, छोटे कांदे- 2 नग, हळद - 10 ग्राम, चिरायता पान पाऊडर - 20 ग्राम, स्वीट बेसिलचे पान - 1 मूठ, कडूलिंबाचे पान - 1 मूठ, गूळ - 100 ग्राम

**मिश्रण तयार करण्याची पद्धती :**

1. जिरे, मिरे आणि धने यांना 15 मिनिटे भिजत ठेवा
2. वरील सर्व सामग्री एकत्र करून तिची पेस्ट तयार करा

**वापर करण्याची पद्धत :**

1. सकाळ - संध्याकाळ छोटे- छोटे लाडू बनवून पशुला चारावे

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# हगवण





मेथीदाने



काळे मिरे



कांदे



खसखस



जिरे



हळद



लसूण



कडीपत्ता



गुळ



हिंग

## सामग्री : (एक दिवसा साठी)

मेथीदाने- 10 ग्राम, कांदे - 1 नग, लसूण - 1 पाकळी, जिरे- 10 ग्राम, हळद- 10 ग्राम, कडीपत्ता -1 मूठ, खसखस - 5 ग्राम, काळे मिरे- 10 ग्राम, गुळ - 100 ग्राम, हिंग- 5 ग्राम

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. जिरे, खसखस , मेथी आणि हिंग यांना थोडेसे काळे होईपर्यंत भाजून घ्या
2. नंतर थंड करून बियांना बारीक वाटून घ्या
3. इतर सर्व सामग्री सोबत याचे पेस्ट तयार करा

## वापर करण्याची पद्धत :

1. मिश्रणाचे छोटे -छोटे लाडू बनवून घ्या
2. तयार 1-2 लाडू पशुला दिवसातून एक वेळेस असे सलग एक ते तीन दिवस किंवा आराम मिळेपर्यंत चारा

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# पोट फुगी आणि अपचन



कांदे



काळे मिरे



लसूण



विड्याचे पान



लाल मिर्ची





अद्रक/आले



जिरे



हळद



गुळ



मीठ

## सामग्री : (एक दिवसा साठी)

कांदे - 100 ग्राम, लसूण - 10 पाकळ्या, लाल मिर्ची - 2 नग,
जिरे- 10 ग्राम, हळद - 10 ग्राम, गुळ - 100 ग्राम,
काळे मिरे -10 ग्राम, विड्याचे पान - 10 नग, आद्रक - 100 ग्राम

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. काळे मिरे आणि जिरे 30 मिनिट भिजत ठेवा
2. भिजलेले मिरे, जिरे एवं इतर सर्व सामग्री एकत्र करून त्याची पेस्ट तयार करून घ्या

## वापर करण्याची पद्धत :

1. तयार पेस्ट चे छोटे - छोटे लाडू बनवून घ्या
2. तयार छोटे लाडू दिवसातून तीन चार वेळेस आजारी पशुला सलग तीन दिवस थोड्या मिठा सोबत खाऊ घाला

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# जंत/कृमी




## सामग्री : (एक दिवसा साठी)

कांदे - 1 नग, लसूण - 5 पाकळ्या, मोहरी - 10 ग्राम, कडूलिंबाचे पान - 1 मूठ, जिरे- 10 ग्राम, कारले - 50 ग्राम, हळद- 5 ग्राम, काळे मिरे- 5 ग्राम, केळीचा बूंदा - 100 ग्राम, द्रोणपुष्पि / तुंबी पाने - 1 मूठ, गुळ - 100 ग्राम

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. जिरे, मिरे आणि मोहरी यांना 30 मिनिटे भिजत ठेवा
2. भिजलेले जिरे, मिरे आणि मोहरी यांना इतर सामग्री सोबत एकत्र करून पेस्ट तयार करा

## वापर करण्याची पद्धत :

1. मिश्रणाचे छोटे -छोटे लाडू बनवून घ्या
2. तयार 1-2 लाडूवर थोडेसे मीठ लावून पशुला दिवसातून एक वेळेस असे सलग तीन दिवस चारा

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# गोचीड आणि बाह्य परजीवी




लसूण







हळद




कडूलिंबाचे पान



घाणेरी/गोचडीचे पान



वेखंड



कडूलिंबाचे बिया



तुळशीचे पान

## सामग्री :

लसूण -10 पाकळ्या, कडूलिंबाचे पान - 1 मूठ, कडूलिंबाचे बिया - 1 मूठ, वेखंड- 10 ग्राम, हळद - 20 ग्राम, घाणेरी/गोचडीचे पान - 1 मूठ, तुळशीचे पान - 1 मूठ

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. वरील सर्व सामग्री एकत्र करून त्याची पेस्ट तयार करा
2. या मिश्रणामध्ये 1 लीटर साफ पाणी मिसळा
3. मिश्रणाला बारीक चाळणी किंवा कपड्याने गाळून घ्या
4. वरील द्रव्याला स्प्रे बाटली मध्ये भरून घ्या

## वापर करण्याची पद्धत :

1. पशूच्या पूर्ण शरीरावर ह्याची फवारणी करा
2. गोठ्यामधील चिरा / भेगा यावरही फवारणी करा
3. फवारणी यंत्र नसल्यास, कापड वरील द्रव्यात भिजवून शरीरावर लावता येते
4. जर गोचीड कमी झाले नाहीत तर एका आठवड्याने ही प्रक्रिया परत करा
5. याचा वापर शक्यतो ऊन असेल तेंव्हाच करा

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# देवी / चामखीळ / भेगा



लसूण





लोणी




हळद



कडूनिंब पान



जीरे



रान तुळस (स्वीट बेसिल)

## सामग्री :

लसूण - 5 पाकळ्या, हळद - 15 ग्रॅम, जीरे - 15 ग्रॅम, रान तुळस (स्वीट बेसिल)- एक मूठ, कडूनिंब पान - एक मूठ, लोणी / तूप - 50 ग्रॅम

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. 15 मिनिटासाठी जीरे पाण्यात भिजत ठेवा
2. वरील सर्व सामग्रीचे बारीक पेस्ट तयार करा
3. नंतर लोणी मिसळून मिश्रण तयार करा

## वापर करण्याची पद्धत :

1. देवी/चामखीळ बरा होत नाही तो पर्यंत त्या भागावर वरील मिश्रण जास्तीत जास्त वेळा लावत रहा
2. मिश्रण लावण्या अगोदर कातडी स्वच्छ आणि कोरडी करून घ्या

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# ऐलर्जी / विषबाधा





नागवेलीचे पान
(विड्याचे)



खडे मीठ



मीरे

## सामग्री : (एक खुराकी साठी)

तामिळ सिद्धा- परंपरागत ऊक्तीनुसार : 3 किंग्स
(i) नागवेलीचे पान (विड्याचे) - 10 नग
(ii) मीरे - 10 ग्राम
(iii) मीठ - 10 ग्राम

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. वरील सामग्री एकत्र करून पेस्ट तयार करा
2. तयार पेस्ट मधे गुळ मिसळून एकजीव करा

## वापर करण्याची पद्धत :

1. वरील मिश्रण थोड्या- थोड्या प्रमाणात  खाऊ घालत रहा
2. दिवसातून तीन वेळेस ही खुराक दोन आठवड्यापर्यंत द्या

नोट - याशिवाय पशु नाजूक अवस्थेत असेल तर वरील मिश्रणाचा 2-3 थेंब रस डोळ्यात 1-1 तासाने टाकत रहा (गुळा व्यतिरिक्त)

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# सांधेसूज



कोरफड





लसूण



चुना



कांडवेल, हडजोड (तणा )



हळद

**सामग्री :** (एक दिवस वापरण्यासाठी)

कोरफड - 100 ग्रॅम, चुना - 10 ग्रॅम, कांडवेल/ हडजोड - 100 ग्रॅम, हळद - 15 ग्रॅम, लसूण - 5 कळ्या, तिळाचे तेल - 1 ली.

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. वरील सामग्रीचे एकजीव मिश्रण तयार करा
2. वरील मिश्रण एक लीटर तेलामध्ये उकळून घ्या आणी थंड करा

## वापर करण्याची पद्धत :

1. मिश्रण कोमट झाल्यानंतर सूजलेल्या सांध्यावर दिवसातून चार ते पाच वेळेस लावा
2. सोबतच दिवसातून दोन वेळेस गरम पाण्याने शेकत रहा

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# खोकला



आडूळसा





मिरे



तुळस



लसूण



हळद

**सामग्री :** (एक दिवस वापरण्यासाठी)

अडुळसा - 1 पान, तुलसीचे पान - मूठभर, लसूण - 5 कळ्या, हळद - 10 ग्रॅम, मिरे - 10 ग्रॅम

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. मिरे 15 – 20 मीनट भिजत ठेवा आणि नंतर वाटून घ्या
2. वरील सर्व सामग्री एकत्र करून पेस्ट तयार करा आणि गुळासोबत मिश्रण तयार करा

## वापर करण्याची पद्धत :

पशू पूर्ण बरा होईपर्यंत दिवसातून 2 – 3 वेळेस चारत रहा

**यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा**

# पशुला उठता न येणे



देशी अंडे





कांडवेल
(हडजोड)



शेवग्याची पाने

**सामग्री :** (एक खुराक साठी)
देशी अंडे - 2 नग, शेवग्याची पाने - 4 मूठि, कांडवेल - 4 मूठि ,
गूळ - आवश्यकतेनुसार

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

1. ताजे अंडे घ्या
2. कांडवेल आणि शेवग्याची पाने याची पेस्ट तयार करा आणि गुळासोबत मिक्स करा

## वापर करण्याची पद्धत :

1. दिवसातून तीन वेळेस कवचसहित 2 – 2 अंडी चारा
(अंडी खाऊ घालण्यागोदर अंड्याला छोटे छिद्र करून घ्या)
2. दोन – दोन तासांनी चार मूठि वरील पेस्ट चारत रहा
3. चार दिवसापर्यंत पशुला उठवण्याचा प्रयत्न करू नका

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# कीटकनाशक / साईनाईड/बुरशीजनीत विषबाधा



विड्याचे पान





शेवग्याच्या पानाचा अर्क



मिरे



चिंच



मीठ

## सामग्री :

3 राजा : एक वेळेस वापरण्यासाठी

विड्याचे पान - 10 नग, मिरे - 10 ग्रॅम, मीठ - 10 ग्रॅम

अन्य सामग्री : एक दिवसा साठी

चिंच - 1 किलो, पाणी - 1 लीटर, शेवग्याच्या पानाचा अर्क - 1 किलो

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

3 राजा तयार करण्याची पद्धत :

1. विड्याचे पान, मिरे आणि मीठ याची पेस्ट तयार करा

2. गुलासोबत मिक्स करा

अन्य सामग्री तयार करणे : एक दिवस वापरण्यासाठी

1. 15 मिनिटे चिंच पाण्यात भिजत ठेवा 2. चिंचेचा रस काढून घ्या

3. शेवग्याच्या पाण्याचा रस, गूळ आणि पाणी एकत्र करा


चांगले मिक्स करा

## वापर करण्याची पद्धत :

1. 3 राजा पहिली खुराक द्या 2. 200 मिलि चिंच-शेवगा-गूळ याचे मिश्रण प्रत्येक दोन-दोन तासाला पाजत रहा 3. मधेच 3 राजा ची एक-एक खुराक देत रहा.

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# रक्तमिश्रित दूध



कडी पत्ता





गुळ



शेवग्याची पाने



लिंबु

**सामग्री :** (एक दिवसा साठी)

कडी पत्ता - 2 मूठी, शेवग्याची पाने - 2 मूठी, गुळ - 100 ग्रॅम, लिंबु - 6 नग

## मिश्रण तयार करण्याची पद्धती :

कडीपत्ता व शेवग्याची पाने याचे गुळासोबत पेस्ट तयार करा

## वापर करण्याची पद्धत :

1. वरील मिश्रण दिवसातून 2 वेळा पशु पूर्ण पणे बरा होई पर्यंत चारत रहा.

2. एक वेळेस दोन लिंबु चे काप करुन पशुला चारा, असे तीन दिवस चारत रहा.

**नोटः** सोबतच स्तनदाह रोगा वरील पारंपारीक उपचार करत रहा.

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# माजावर न येणे




## वापर करण्याची पद्धत :

खाली दर्शविल्या प्रमाणे वरील सर्व ताजी सामग्री दिवसातून दोन वेळेस गुळ आणि मीठ सोबत चारा

1. एक मुळा दररोज असे पाच दिवस
2. कोरफडीचे एक संपूर्ण पान, नंतरचे चार दिवस
3. चार मुठी शेवग्याची पाने पुढचे चार दिवस
4. चार मुठी कांडवेल पुढचे चार दिवस
5. चार मुठी कडी पत्ता हळदी सोबत पुढचे चार दिवस

नोट - उपचार सुरू करण्याच्या 15 दिवस अगोदर कृमीनाशक औषध द्या

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा



ही पुस्तिका प्रो. एन. पुण्यमूर्ती (profpunniya@gmail.com) यांच्या कडून
प्राप्त तांत्रिक माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली आहे.
अधिक माहिती साठी संपर्क : anand@nddb.coop


**राष्ट्रीय डेरी विकास बोर्ड, आणंद**

फोनः 02692-260148, 260149 • फैक्सः 02692-260157

वेबसाइटः www.nddb.coop

*facebook.com/NationalDairyDevelopmentBoard*

December, 2021


येथे नमूद केलेली सामान्य झाडांची पानं, मसाले आणि इतर काही साहित्य सुरक्षित मानले जातात आणि ते केवळ मार्गदर्शक सूचक आहेत. रोगांचे योग्य ते निदान करून त्याच्या व्यवस्थापनासाठी जवळच्या पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा